

**कोल्हापूर : नवी दिल्ली येथे उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री हरिश रावत व माजी क्रिकेटपटू चेतन शर्मा यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य विराट गिरी.**

# घोडावत पॉलिटेक्निकला 'बेस्ट पॉलिटेक्निक इन महाराष्ट्र' पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संजय घोडावत पॉलिटेक्निकला टुडे रिसर्च अँड रेटिंग्स (नवी दिल्ली) या संस्थेमार्फत 'बेस्ट अपकमिंग पॉलिटेक्निक इन महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात उत्तराखंड राज्याचे माजी मुख्यमंत्री हरिश रावत व क्रिकेटपटू चेतन शर्मा यांच्या हस्ते प्राचार्य विराट गिरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. टुडे रिसर्च अँड रेटिंग्स या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात शैक्षणिक कामकाज, प्लेसमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर, संस्थेत राबविण्यात येणारे उपक्रम, उपलब्ध सुविधा इत्यादी बाबी कटाक्षाने तपासण्यात आल्या. या पुरस्काराबद्दल घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले यांनी प्राचार्य विराट गिरी व टीमचे अभिनंदन केले.